पुढारी





सांगली : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कॅनॉईंग स्पर्धेतील चित्तथरारक क्षण. (छाया : सचिन सुतार)

# शिवाजी विद्यापीठाच्या महिला खेळाडूंची लक्षवेधी कामगिरी

## आंतरविद्यापीठ कयाकिंग; कॅनॉईंग स्पर्धेवर अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाचे वर्चस्व

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

वाऱ्याच्या वेगाने पाणी कापत चाललेल्या जिगरबाज युवक आणि युवतींनी चाहत्यांची वाहवा मिळवली. रविवारी दिवसभर कृष्णा नदीपात्रात चाललेल्या चित्तथरारक स्पर्धांनी चाहत्यांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. स्पर्धेत अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने वर्चस्व प्राप्त केले. त्यानंतर मोहालीचे चंदीगड विद्यापीठ आणि चंदीगडचे पंजाब विद्यापीठ यांच्या क्रीडापटूंनीही लक्षवेधी कामगिरी केली. शिवाजी विद्यापीठाच्या महिलांनी के-१ (१००० मीटर), सी-१ (१००० मी.) आणि के-४ (१००० मी.) या स्पर्धांत चतुर्थ स्थान पटकावले.

भारतीय विद्यापीठे महासंघ (ए. आय. यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कॅनॉईंग (पुरुष व महिला) स्पर्धेचा रविवारचा दुसरा दिवस जोशात पार पडला.

**स्पर्धेतील १००० मीटर अंतराच्या विविध गटांतील निकाल असा : (कंसात विद्यापीठ व नोंदविलेली वेळ) :**

**पुरुष गट : के १** (१००० मीटर) वंश शर्मा (मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, राजस्थान, ०३:४१.३५), थांगसंबाम डी. (लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, पंजाब, ०३:४८.१५), मनवीर सिंह (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:४९.८२), अनोश बारला (बरकतुल्लाह विद्यापीठ, भोपाळ, ०३:५१.५३),

**सी १.** (१००० मीटर) हर्ष पाल (लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, ०४:०२.५४), हर्ष शर्मा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०४:११.८९), प्रशांत चौधरी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०४:१६.७२), अभिषेक नवले (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, ०४:२१.८६)

**के २.** (१००० मीटर) आदित्य सिंह, सचिन (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:१८.४४), शुभम, मनवीर सिंह (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:१८.९५), वंश, देव चौधरी (चंदीगड विद्यापीठ, ०३:३०.४३), प्रथमेश पाटील, निरंजन पाटील (भारती अभिमत विद्यापीठ, पुणे, ०३:३६.८६)

**सी २.** (१००० मीटर) प्रिन्स गोस्वामी, हर्ष वर्मा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:४२.१३), दर्शन मोरे, अल्पेश धुळे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे,

**आंतरविद्यापीठ कयाकिंग, कॅनॉईंग स्पर्धा**

०३:४५.३३), सिद्धांत, अतुल (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:४७.३८)

**के ४.** (१००० मीटर) मयंक शर्मा व सहकारी (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:०२.४४), आदर्श बिजू व सहकारी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०३:०६.७०), प्रथमेश पाटील व सहकारी (भारती अभिमत विद्यापीठ, पुणे, ०३:०८.४८), कृतिक कुमार व सहकारी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:०८.७४).

**महिला गट : के १.** (१००० मीटर) चंद्रकला कुशवाहा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०४:१५.४०), निधी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली ०४:१८.०४), दिव्यांशी राघोरटे (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, ०४:३४.४०), उर्वशी घुंगरे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ०४:४४.८८)

**सी १.** (१००० मीटर) - निक्की (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०४:४५.८३), ऋतिका कुमारी (गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा, ०४:५८.५९), ओ. बिड्या लक्ष्मीदेवी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०५:००.३८), प्रिया चव्हाण (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ०५:१९.९४)

**के २.** (१००० मीटर) कुसुम, अचल काचरू साहरे (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०४:०४.०४), लवप्रीत कौर, चंद्रकला कुशवाहा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०४:१५.४१), दीप्ती, जस्मीन (पुदुचेरी विद्यापीठ, पुदुचेरी, ०४:२४.७८), अल्पना सानी, नंदिनी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०४:२७.८९)

**सी २.** (१००० मीटर) प्रिया चौरसिया, रिशिका कुमारी एक्का (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०४:२९.८३), ऋतिका कुमारी, रिया (गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा, ०४:५०.२७), नीतू सपनवाने, मनमती बघेल (पं. रविशंकर शुक्ला विद्यापीठ, रायपूर, ०५:००.७१)

**के ४.** (१००० मीटर) रिशिता व सहकारी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०३:४२.७६), भूमी सोनकर व सहकारी (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:५०.१५), कुसुम गुप्ता व सहकारी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०४:००.७४), उर्वशी घुगरे, आरती जाधव, शुहाना जमादार व निकिती मगदूम (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ०४:१३.२३).


Powered by: erelego.com

## अज्ञात वाहनाच्या धडकेत तरूण ठार

जत, दि.६ (वार्ताहर) - जत शहरातील विठ्ठलनगर येथे रविवारी पहाटे अज्ञात वाहनाच्या धडकेत २५ वर्षीय बापू शिवाजी वाघमोडे या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. बापू वाघमोडे हा रस्त्याने जात असताना भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना समोरून धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की बापू वाघमोडे यांचा जागीच मृत्यू झाला. जत पोलिस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हलत खेळत अन्यायाचा प्रतिकार करणारे स्वतंत्र विचाराचे हिंमत महोत्सवी दैनिक

# ललकार

सांगली | मंगळवार, दि.७ एप्रिल २०२६ | पान नं. ८

## महिलेचे सव्वा लाखाचे दागिने चोरीस

मिरज, दि.६ (वार्ताहर) - मिरजेतील बस स्थानकातून महिलेचे सुमारे सव्वा लाख रुपये किमतीचे दागिने चोरीस गेल्याची घटना घडली आहे. सदर महिलेने याबाबत पोलिसात फिर्याद दिली असून महात्मा गांधी चौक पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. लक्ष्मी रायगोंडा रोगे (वय ३१, रा. ब्रह्मनाळ, ता.पलूस) यांनी याबाबत पोलिसात फिर्याद दिली आहे. प्रवासी महिलांचे दागिने चोरी होण्याची यापूर्वी अनेकदा घटना घडल्या आहेत.

# सांगली येथील कयाकिंग व कॅनॉईंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिलांची लक्षवेधक कामगिरी

| ललकार वृत्त |

सांगली, दि.६ (प्रतिनिधी) - भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कॅनॉईंग (पुरुष व महिला) स्पर्धेत आज दुसऱ्या दिवसअखेर स्पर्धेत अमृतसरच्या गुरु नानक देव विद्यापीठाने वर्चस्व प्राप्त केले. त्याखालोखाल मोहालीचे चंदीगड विद्यापीठ आणि चंदीगडचे पंजाब विद्यापीठ यांच्या क्रीडापटूंनीही लक्षवेधी कामगिरी केली. शिवाजी विद्यापीठाच्या महिलांनी के-१ (१००० मीटर), सी-१ (१००० मी.) आणि के-४ (१००० मी.) या स्पर्धेत चतुर्थ स्थान पटकावले.

येथील कृष्णा बोट क्लबमध्ये आज झालेल्या स्पर्धेत गुरु नानक देव विद्यापीठाने पुरुष गटातील के-२, सी-२ व के-४ आणि महिला गटातील के-१ व के-२मध्ये अव्वल कामगिरी केली. चंदीगड विद्यापीठानेही पुरुष व महिला गटातील के-२ व के-४ प्रकारात उत्तम कामगिरी नोंदवली. पंजाब विद्यापीठाने महिला गटातील सी-१ आणि सी-२ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने पुरुष गटातील सी-१ मध्ये अव्वल येत उपस्थितांची वाहवा मिळवली.

स्पर्धेतील १००० मीटर अंतराच्या विविध गटांतील निकाल अनुक्रमे (कंसात विद्यापीठ व नोंदविलेली वेळ याप्रमाणे) असे:





पुरुष गट: घ१ (१००० मीटर) वंश शर्मा (मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, राजस्थान, ०३:४१.३५), बांगसंबाम डी. (लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, पंजाब, ०३:४८.१५), मनवीर सिंह (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:४९.८२), अनोश बारला (बरकतुल्लाह विद्यापीठ, भोपाळ, ०३:५१.५३).

३१ (१००० मीटर) हर्ष पाल (लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, ०४:०२.५४), हर्ष शर्मा (गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०४:११.८९), प्रशांत चौधरी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०४:१६.७२), अभिषेक नवले (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, ०४:२१.८६)

घ२ (१००० मीटर) आदित्य सिंह, सचिन (गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:१८.४४), शुभम, मनवीर सिंह (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:१८.९५), वंश, देव चौधरी (चंदीगड विद्यापीठ, ०३:३८.४३), प्रथमेश पाटील, निरंजन पाटील (भारती अभिमत विद्यापीठ, पुणे, ०३:३६.८६)

३२ (१००० मीटर) प्रिन्स गोस्वामी, हर्ष वर्मा (गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:४२.१३), दर्शन मोरे, अन्वेश धुळे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, ०३:४५.३३), सिद्धांत, अतुल (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:४७.३८)

घ४ (१००० मीटर) मयंक शर्मा व सहकारी (गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:०२.४४), आदर्श बिंदू व सहकारी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०३:०६.७०), प्रथमेश पाटील व सहकारी (भारती अभिमत विद्यापीठ, पुणे, ०३:०८.४८), कृतिक कुमार व सहकारी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:०८.७४).

महिला गट : घ१ (१००० मीटर) चंद्रकला कुशवाहा (गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०४:१५.४८), निधी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली ०४:१८.०४), दिव्यांशी रायोरटे (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, ०४:३४.४०), उर्वशी घुगरे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ०४:४४.८८)

३१ (१००० मीटर) - निक्की (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०४:४५.८३), ऋतिका कुमारी (गुरु काशी विद्यापीठ, भटिंडा, ०४:५८.५९), ओ. बिजया लक्ष्मीदेवी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०५:००.३८), प्रिया चव्हाण (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ०५:१९.१४)

घ२ (१००० मीटर) कुसुम, अचल काचरू साहो (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०४:०४.०४), लवप्रीत कौर, चंद्रकला कुशवाहा (गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०४:१५.४१), दीप्ती, जस्मीन (पाँडिचेरी विद्यापीठ, पुदुच्चेरी, ०४:२४.७८), अल्पना सानी, नंदिनी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०४:२७.८१).

epaper : www.sindhudurgsamachar.com
Mahrashtra : 9422043543 Goa : 9673153300 Karnataka : 9422043300

# सिंधुदुर्ग समाचार

संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम
कोल्हापूर
Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR/170/2024-2026

● मंगळवार दि.७ एप्रिल २०२६ ● पाने ४ ● वर्ष ३६ ● अंक ०४५ ● कोल्हापूर, सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, सांगली, सातारा, बेळगाव, गोवा येथून प्रसिध्द ● e-mail: klpsindhu@gmail.com ● RNI NO : MAHMAR/2006/17335 ● किंमत १ ●

ऐकत रहा mango FM 90.4

# अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कॅनॉईंग स्पर्धेवर पंजाबच्या विद्यापीठांचे वर्चस्व



**सांगली/प्रतिनिधी :**

भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कॅनॉईंग (पुरुष व महिला) स्पर्धेत आज दुसऱ्या दिवसअखेर स्पर्धेत अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने वर्चस्व प्राप्त केले. त्याखालोखाल मोहालीचे चंदीगड विद्यापीठ आणि चंदीगडचे पंजाब विद्यापीठ यांच्या क्रीडापटूंनीही लक्षवेधी कामगिरी केली. शिवाजी विद्यापीठाच्या महिलांनी के-१ (१००० मीटर), सी-१ (१००० मी.) आणि के-४ (१००० मी.) या स्पर्धांत चतुर्थ स्थान पटकावले.

येथील कृष्णा बोट क्लबमध्ये आज झालेल्या स्पर्धांत गुरू नानक देव विद्यापीठाने पुरुष गटातील के-२, सी-२ व के-४ आणि महिला गटातील के-१ व के-२मध्ये अव्वल कामगिरी केली. चंदीगड विद्यापीठानेही पुरुष व महिला गटातील के-२ व के-४ प्रकारात उत्तम कामगिरी नोंदवली. पंजाब विद्यापीठाने महिला गटातील सी-१ आणि सी-२ स्पर्धांत प्रथम क्रमांक मिळवला. लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने पुरुष गटातील सी-१ मध्ये अव्वल येत उपस्थितांची वाहवा मिळवली.

स्पर्धेतील १००० मीटर अंतराच्या विविध गटांतील निकाल अनुक्रमे (कंसात विद्यापीठ व नोंदविलेली वेळ याप्रमाणे) असेः

पुरुष गटः

K1 (1000 मीटर) – वंश शर्मा (मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, राजस्थान, 03:41.35), थांगसंबाम डी. (लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, पंजाब, 03:48.15), मनवीर सिंह (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, 03:49.82), अनोश बारला (बरकतुल्लाह विद्यापीठ, भोपाळ, 03:51.53),

C1 (1000 मीटर) – हर्ष पाल (लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, 04:02.54), हर्ष शर्मा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, 04:11.89), प्रशांत चौधरी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, 04:16.72), अभिषेक नवले (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, 04:21.86)

K2 (1000 मीटर) – आदित्य सिंह, सचिन (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, 03:18.44), शुभम, मनवीर सिंह (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, 03:18.95), वंश, देव चौधरी (चंदीगड विद्यापीठ, 03:30.43), प्रथमेश पाटील, निरंजन पाटील (भारती अभिमत विद्यापीठ, पुणे, 03:36.86)

C2 (1000 मीटर) – प्रिन्स गोस्वामी, हर्ष वर्मा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, 03:42.13), दर्शन मोरे, अल्पेश धुळे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, 03:45.33), सिद्धांत, अतुल (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, 03:47.38)

K4 (1000 मीटर) – मयंक शर्मा व सहकारी (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, 03:02.44), आदर्श बिजू व सहकारी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, 03:06.70), प्रथमेश पाटील व सहकारी (भारती अभिमत विद्यापीठ, पुणे, 03:08.48), कृतिक कुमार व सहकारी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, 03:08.74).

महिला गटः

K1 (1000 मीटर) – चंद्रकला कुशवाहा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, 04:15.40), निधी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली 04:18.04), दिव्यांशी राघोरटे (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागरूप विद्यापीठ, नागपूर, 04:34.40), उर्वशी घुगरे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 04:44.88)

C1 (1000 मीटर) - निक्की (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, 04:45.83), ऋतिका कुमारी (गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा, 04:58.59), ओ. बिडया लक्ष्मीदेवी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, 05:00.38), प्रिया चव्हाण (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 05:19.94)

K2 (1000 मीटर) – कुसुम, अचल काचरू साहरे (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, 04:04.04), लवप्रीत कौर, चंद्रकला कुशवाहा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, 04:15.41), दीप्ती, जस्मीन (पाँडिचेरी विद्यापीठ, पुदुच्चेरी, 04:24.78), अल्पना सानी, नंदिनी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, 04:27.89)

C2 (1000 मीटर) –प्रिया चौरसिया, रिशिका कुमारी एक्का (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, 04:29.83), ऋतिका कुमारी, रिया (गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा, 04:50.27), नीतू सपनवाने, मनमती बघेल (पं. रवीशंकर शुक्ला विद्यापीठ, रायपूर, 05:00.71)

K4 (1000 मीटर) –रिशिता व सहकारी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, 03:42.76), भूमी सोनकर व सहकारी (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, 03:50.15), कुसुम गुप्ता व सहकारी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, 04:00.74), उर्वशी घुगरे, आरती जाधव, शुहाना जमादार व निकिती मगदूम (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 04:13.23).

07 APR 2026

पुढारी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





सांगली : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कॅनॉईंग स्पर्धेतील चित्तथरारक क्षण. (छाया : सचिन सुतार)

# शिवाजी विद्यापीठाच्या महिला खेळाडूंची लक्षवेधी कामगिरी

## आंतरविद्यापीठ कयाकिंग; कॅनॉईंग स्पर्धेवर अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाचे वर्चस्व

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

वाऱ्याच्या वेगाने पाणी कापत चाललेल्या जिगरबाज युवक आणि युवतींनी चाहत्यांची वाहवा मिळवली. रविवारी दिवसभर कृष्णा नदीपात्रात चाललेल्या चित्तथरारक स्पर्धांनी चाहत्यांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. स्पर्धेत अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने वर्चस्व प्राप्त केले. त्यानंतर मोहालीचे चंदीगड विद्यापीठ आणि चंदीगडचे पंजाब विद्यापीठ यांच्या क्रीडापटूंनीही लक्षवेधी कामगिरी केली. शिवाजी विद्यापीठाच्या महिलांनी के-१ (१००० मीटर), सी-१ (१००० मी.) आणि के-४ (१००० मी.) या स्पर्धांत चतुर्थ स्थान पटकावले.

भारतीय विद्यापीठे महासंघ (ए. आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कॅनॉईंग (पुरुष व महिला) स्पर्धेचा रविवारचा दुसरा दिवस जोशात पार पडला.

**स्पर्धेतील १००० मीटर अंतराच्या विविध गटांतील निकाल असा : (कंसात विद्यापीठ व नोंदविलेली वेळ) :**

**पुरुष गट : के १** (१००० मीटर) वंश शर्मा (मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, राजस्थान, ०३:४१.३५), थांगसंबाम डी. (लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, पंजाब, ०३:४८.१५), मनवीर सिंह (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:४९.८२), अनोश बारला (बरकतुल्लाह विद्यापीठ, भोपाळ, ०३:५१.५३),

**सी १.** (१००० मीटर) हर्ष पाल (लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, ०४:०२.५४), हर्ष शर्मा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०४:११.८९), प्रशांत चौधरी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०४:१६.७२), अभिषेक नवले (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, ०४:२१.८६)

**के २.** (१००० मीटर) आदित्य सिंह, सचिन (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:१८.४४), शुभम, मनवीर सिंह (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:१८.९५), वंश, देव चौधरी (चंदीगड विद्यापीठ, ०३:३०.४३), प्रथमेश पाटील, निरंजन पाटील (भारती अभिमत विद्यापीठ, पुणे, ०३:३६.८६)

**सी २.** (१००० मीटर) प्रिन्स गोस्वामी, हर्ष वर्मा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:४२.१३), दर्शन मोरे, अल्पेश धुळे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, ०३:४५.३३), सिद्धांत, अतुल (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:४७.३८)

**आंतरविद्यापीठ कयाकिंग, कॅनॉईंग स्पर्धा**

**के ४.** (१००० मीटर) मयंक शर्मा व सहकारी (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:०२.४४), आदर्श बिजू व सहकारी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०३:०६.७०), प्रथमेश पाटील व सहकारी (भारती अभिमत विद्यापीठ, पुणे, ०३:०८.४८), कृतिक कुमार व सहकारी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०३:०८.७४).

**महिला गट : के १.** (१००० मीटर) चंद्रकला कुशवाहा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०४:१५.४०), निधी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली ०४:१८.०४), दिव्यांशी राघोरटे (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, ०४:३४.४०), उर्वशी घुंगरे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ०४:४४.८८)

**सी १.** (१००० मीटर) - निक्की (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०४:४५.८३), ऋतिका कुमारी (गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा, ०४:५८.५९), ओ. बिड्या लक्ष्मीदेवी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०५:००.३८), प्रिया चव्हाण (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ०५:१९.९४)

**के २.** (१००० मीटर) कुसुम, अचल काचरू साहरे (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०४:०४.०४), लवप्रीत कौर, चंद्रकला कुशवाहा (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०४:१५.४१), दीप्ती, जस्मीन (पुदुचेरी विद्यापीठ, पुदुचेरी, ०४:२४.७८), अल्पना सानी, नंदिनी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०४:२७.८९)

**सी २.** (१००० मीटर) प्रिया चौरसिया, रिशिका कुमारी एक्का (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०४:२९.८३), ऋतिका कुमारी, रिया (गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा, ०४:५०.२७), नीतू सपनवाने, मनमती बघेल (पं. रविशंकर शुक्ला विद्यापीठ, रायपूर, ०५:००.७१)

**के ४.** (१००० मीटर) रिशिता व सहकारी (चंदीगड विद्यापीठ, मोहाली, ०३:४२.७६), भूमी सोनकर व सहकारी (गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर, ०३:५०.१५), कुसुम गुप्ता व सहकारी (पंजाब विद्यापीठ, चंदीगड, ०४:००.७४), उर्वशी घुगरे, आरती जाधव, शुहाना जमादार व निकिती मगदूम (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ०४:१३.२३).

0 7 APR 2026

पुढारी

# विद्यापीठ सत्र परीक्षेला ६२ हजार ५८९ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला ६२ हजार ५८९ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बी.व्होक., बी.कॉम., बीए, बीबीए, बीएसई, एमबीए आदी २६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १५४ केंद्रांवर सुरळीतपणे झाल्या. परीक्षेत भरारी पथकांकडून कोल्हापूर (५), सांगली (३) अशा एकूण ८ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत झाली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 APR 2026 सकाळ

# गुरुनानक देव विद्यापीठाचे वर्चस्व

## कयाकिंग-कनोईंग स्पर्धा : शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाची लक्षवेधी कामगिरी



सांगली : कृष्णा बोट क्लब येथे झालेल्या कयाकिंग स्पर्धेतील क्षण.

सांगली, ता. ६ : भारतीय विद्यापीठे महासंघ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कनोईंग स्पर्धेत सोमवारी दुसऱ्या दिवसाअखेर अमृतसरच्या गुरुनानक देव विद्यापीठाने वर्चस्व मिळवले. शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने के-१ (१००० मी.), सी-१ (१००० मी.) आणि के-४ (१००० मी.) प्रकारांत चौथे स्थान पटकावले.

कृष्णा बोट क्लब येथे झालेल्या या स्पर्धेत गुरुनानक देव विद्यापीठाने पुरुष गटातील के-२, सी-२, के-४ तसेच महिला गटातील के-१ व के-२ प्रकारांत अव्वल कामगिरी केली. चंदीगड विद्यापीठाने पुरुष व महिला गटातील के-२ व के-४ प्रकारांत दमदार प्रदर्शन केले. पंजाब विद्यापीठाने महिला गटातील सी-१ व सी-२मध्ये प्रथम क्रमांक मिळवला.

**१000 मीटर निकाल**

पुरुष गट : के-१ : वंश शर्मा (मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ), थांगसंबाम डी. (लव्हली प्रोफेशनल), मनवीर सिंह (पंजाब विद्यापीठ), अनोश बारला (बरकतुल्लाह विद्यापीठ). सी-१ : हर्ष पाल (लव्हली प्रोफेशनल), हर्ष शर्मा (गुरू नानक देव), प्रशांत चौधरी (चंदीगड), अभिषेक नवले (चव्हाण मुक्त विद्यापीठ) के-२ : आदित्य सिंह-सचिन (गुरू नानक देव), शुभम-मनवीर सिंह (पंजाब), वंश-देव चौधरी (चंदीगड), प्रथमेश पाटील-निरंजन पाटील (भारती). सी-२ : प्रिन्स गोस्वामी-हर्ष वर्मा (गुरू नानक देव), दर्शन मोरे-अल्पेश धुळे (सावित्रीबाई फुले), सिद्धांत-अतुल (पंजाब). के-४ : मयंक शर्मा व सहकारी (गुरू नानक देव), प्रथमेश पाटील व सहकारी (भारती), कृतिककुमार व सहकारी (पंजाब)

**महिला गट :**

के-१ : चंद्रकला कुशवाहा (गुरू नानक देव), निधी (चंदीगड), दिव्यांशी राघोरटे (नागपूर), उर्वशी घुगरे (शिवाजी). सी-१ : निक्की (पंजाब), ऋतिका कुमारी (गुरू काशी), ओ. बिड्या लक्ष्मीदेवी (चंदीगड), प्रिया चव्हाण (शिवाजी) सी-२ : प्रिया चौरसिया-रिशिका एक्का (पंजाब), ऋतिका कुमारी-रिया (गुरू काशी), नीतू सपनवाने-मनमती बघेल (रायपूर). के-४ : रिशिता व सहकारी (चंदीगड), भूमी सोनकर व सहकारी (गुरू नानक देव), कुसुम गुप्ता व सहकारी (पंजाब), उर्वशी घुगरे व सहकारी (शिवाजी).

महा न्यूज & व्ह्यूज

07 APR 2026

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road, Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.-9175089609

# महाराष्ट्र शासनाच्या कृतीशील धोरणामुळे क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान : मंत्री चंद्रकांतदादा पाटील

## ३७२ क्रीडापटूंचे शासकीय सेवेत थेट समावेशन; सांगलीत अखिल भारतीय कनॉईंग, कयाकिंग स्पर्धांचे उत्साही उद्घाटन

**सांगली, (महान्यूज अँड व्ह्यूज):**

क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून सामोरा येत असून महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक व कृतिशील धोरणामुळे येथील राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज येथे केले. भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे उद्घाटन मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते आज सकाळी येथील कै. वसंत दादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कलापि उद्योगाचे योगेश लोहकरे, अधिसभा सदस्य संजय परमणे, काव्यश्री नलवडे आदी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या तरुणांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहनपर धोरणे लागू केली आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना थेट वर्ग एकची शासकीय नोकरी, राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेत्यांना वर्ग दोन, तर राज्य स्तरावरील विजेत्यांना वर्ग तीन व चारची पदे देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याशिवाय, क्रीडापटूंना आर्थिक बळ देण्यासाठी आकर्षक रोख पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यांना रुपये २ कोटी, राष्ट्रीय स्तरावर रूपये एक कोटी आणि राज्य स्तरावर रुपये ५० लाख इतकी बक्षिसे दिली जात आहेत, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या तेजस्विनी सावंत यांचे पालकत्व घेतल्याचा उल्लेख करत क्रीडापटूंना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले. मंत्री पाटील यांनी पुढे सांगितले की, भारत सन २०३६च्या ऑलिंपिक स्पर्धेसाठी सज्ज होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील सहा दशकांची समृद्ध परंपरा लाभली असून क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठ अग्रस्थानी आहे. कृष्णा नदीवरील स्पर्धेचा ट्रॅक हा शास्त्रीयदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून पाण्याचा प्रवाह स्थिर असल्यामुळे सर्व स्पर्धकांना समान संधी मिळते. देशात क्वचितच आढळणारा सुमारे ९४० मीटरचा सरळ व अडथळेमुक्त ट्रॅक ही या कृष्णा नदीतील स्पर्धास्थळाची खास वैशिष्ट्ये असल्याचे सांगत त्यांनी सर्व सहभागी खेळाडूंना उत्कृष्ट क्रीडा स्पर्धात्मकतेसह सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

सुरवातीला मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून आणि ध्वजारोहण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच, प्रदर्शनीय सामन्यांना मंत्री पाटील यांच्या हस्ते फ्लॅग ऑफने प्रारंभ करण्यात आला. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महादेव ठोंबरे, सोनाली पाटील व डॉ. श्रीदेवी पवार-हिरुगडे यानी सूत्रसंचालन केले, तर अधिसभा सदस्य श्रीनिवास गायकवाड यांनी आभार मानले.

07 APR 2026
सकाळ

# विद्यापीठात शुक्रवारपासून फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे शुक्रवार (ता. १०) ते मंगळवार (ता. १४) दरम्यान फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह होईल.

सप्ताहाचे उद्‌घाटन शुक्रवारी सकाळी साडेदहाला विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत होईल. यावेळी प्रा. सुकुमार कांबळे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन' विषयावर व्याख्यान होईल. महात्मा जोतिराव फुले जयंतीनिमित्त शनिवारी सकाळी साडेदहाला प्राचार्य जी. पी. माळी यांचे 'महात्मा जोतिराव फुले यांचा मानवतावादी सत्यधर्म' विषयावर व्याख्यान होईल. मंगळवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा मुख्य कार्यक्रम होणार असून सकाळी आठला विद्यापीठाच्या मुख्य इमारतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक व पूजन आणि त्यानंतर सकाळी दहाला डॉ. प्रशांत बनसोडे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्य' विषयावर व्याख्यान होईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

## अन्य कार्यक्रम असे...

■ रविवारी (सकाळी १०.३०) - प्रा. रमेश जाधव यांचे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समतामूलक समाज निर्मितीचे कार्य' विषयावर व्याख्यान

■ सोमवारी (सकाळी १०.३०) - डॉ. प्रकाश कांबळे लिखित 'वर्तमान उपयुक्त अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' ग्रंथावरील परिसंवादात डॉ. प्रवीण जाधव, गिरीश मोरे यांचा सहभाग. सायंकाळी ५.३० वा. गायक कबीर नाईकनवरे यांचा 'सलाम संविधान' कार्यक्रम.

07 APR 2026
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तेरा कोटी मिळाले २७ वर्षांनी

## विद्यापीठातील देयके निकाली; ३५० शिक्षक कर्मचाऱ्यांना दिलासा

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ६ : गेल्या सत्तावीस वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पदोन्नतीतील फरक, वैद्यकीय बिलांचे सुमारे तेरा कोटी रुपये शिवाजी विद्यापीठाकडे जमा झाले. त्यामुळे विद्यापीठातील ३५० हून अधिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला.**



शिवाजी विद्यापीठ : पदोन्नतीचा फरक, वैद्यकीय बिलांचा प्रश्न मार्गी लागल्याबद्दल अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघातर्फे अध्यक्ष प्रा. एन. बी. गायकवाड यांनी डॉ. ज्योती जाधव यांचा सत्कार केला. यावेळी शेजारी डॉ. प्रकाश बच्छाव, व्ही. एन. शिंदे, सुहासिनी पाटील, अजित चौगुले, आदी उपस्थित होते.

काही तांत्रिक कारणांमुळे आणि त्रुटींची पूर्तता झाली नसल्याने विद्यापीठातील या शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीमधील फरक आणि वैद्यकीय बिलांची रक्कम १९९९ पासून शासनाकडे प्रलंबित होती. संबंधित रक्कम मिळावी यासाठी विद्यापीठासह अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघाच्या माध्यमातून राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर पाठपुरावा सुरू होता. त्याला कोल्हापूर विभागीय सहसंचालक कार्यालयाने त्यात कागदपत्रांच्या पातळीवरील आवश्यक ती पूर्तता करत पाठबळ दिले. त्याचा सकारात्मक परिणाम झाला आणि मार्च अखेरीस या पदोन्नतीमधील फरक, वैद्यकीय बिलांपोटीची सुमारे तेरा कोटी रुपयांची रक्कम विद्यापीठाकडे जमा झाली.

या बद्दल महासंघातर्फे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, उपकुलसचिव प्रिया देशमुख, अंतर्गत लेखापरीक्षक अजित चौगुले यांचा सत्कार करण्यात आला.

> २७ वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटल्याने शिक्षक, कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, आदींचे सहकार्य लाभले. अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ शिक्षकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.
>
> **- प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड**, अध्यक्ष, अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ

यावेळी महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड, एस. टी. कोंबडे, पी. डी. पाटील, प्रतिभा देसाई, आर. व्ही. गुरव, राहुल माने, एस. जी. घाणे, कबीर खराडे उपस्थित होते.

07 APR 2026
पुढारी

# चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाचा मार्ग मोकळा

## नवे नियम जाहीर; २०२६-२७ पासून अंमलबजावणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत महत्वाच्या असलेल्या चार वर्ष पदवी अभ्यासक्रमाचा मार्ग मोकळा करत महाविद्यालयांसाठी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. याबरोबर ऑनर्स आणि ऑनर्स विथ रिसर्च अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी महाविद्यालयांना पात्रता निकष पूर्ण करणे बंधनकारक असल्याचेही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सोमवारी जारी केलेल्या शासन निर्णयात म्हटले आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णयातून जाहीर केलेल्या सूचनांनुसार, ही नवीन प्रणाली शैक्षणिक' वर्ष २०२६-२७ पासून राज्यातील महाविद्यालयात लागू होणार असून, चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आठ सत्रांमध्ये विभागला जाणार आहे. विद्यार्थ्यांना तीन वर्षांनंतर पदवी घेऊन बाहेर पडण्याचा किंवा चौथ्या वर्षासाठी पुढे जाण्याचा पर्याय उपलब्ध राहील. चौथे वर्ष पूर्ण करणाऱ्यांना ऑनर्स पदवी, तर संशोधन पर्याय निवडणाऱ्यांना प्रबंध किंवा संशोधन प्रकल्प सादर केल्यानंतर 'ऑनर्स विथ रिसर्च' पदवी दिली जाणार आहे. संबंधित विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम किंवा पीएचडी संशोधन केंद्र नसलेल्या महाविद्यालयांना थेट परवानगी मिळणार नसल्याचेही या शासन निर्णयात म्हटले आहे. विशेषतः 'ऑनर्स विथ रिसर्च' अभ्यासक्रमासाठी त्या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे अनिवार्य करण्यात आले आहे.


जनसंपर्क कक्ष
0 7 APR 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात १० पासून फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने १० ते १४ एप्रिल या कालावधीत फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी (१० रोजी ) सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत सप्ताहाचे उद्घाटन होईल. यावेळी प्रा. सुकुमार कांबळे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन' या विषयावर व्याख्यान होईल. महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. ११) सकाळी १०.३० वाजता बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या सभागृहात प्राचार्य जी. पी. माळी यांचे 'महात्मा जोतीराव फुले यांचा मानवतावादी सत्यधर्म' या विषयावर व्याख्यान होईल. रविवारी (दि. १२) सकाळी १०.३० वाजता



**• विशेष व्याख्यानांसह 'सलाम संविधान' कार्यक्रमाचे आयोजन**

शिवाजी विद्यापीठाच्या शिववार्ता (@ ShivVarta) या युट्यूब वाहिनीवर प्रा. रमेश जाधव यांचे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समतामूलक समाज निर्मितीचे कार्य' या विषयावर व्याख्यान होईल. सोमवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता राजर्षि शाहू सभागृहात डॉ. प्रकाश कांबळे लिखित 'वर्तमान उपयुक्त अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथावर परिसंवाद आयोजित केला. या परिसंवादात डॉ. प्रवीण जाधव व डॉ. गिरीश मोरे सहभागी होतील. त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये विद्यार्थी विकास विभाग व शिवाजी विद्यापीठ वसतिगृहातील विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध गायक कबीर नाईकनवरे यांचा 'सलाम संविधान' हा कार्यक्रम आयोजित केला आहे. मंगळवारी (दि. १४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा मुख्य कार्यक्रम होणार असून सकाळी ८ वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक व पूजन आणि त्यानंतर सकाळी १० वाजता डॉ. प्रशांत बनसोडे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्य' या विषयावर व्याख्यान होईल. या सर्व कार्यक्रमांचा नागरिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.